जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७५६ दिनांक - २३/१०/२०२३**

लोणीकंद पोलीस स्टेशन,पुणे शहर

## सराईत गुन्हेगाराकडुन पुणे शहर, पिंपरी चिंचवड व पुणे ग्रामीण जिल्हयातील १८ गुन्हे उघडकीस आणुन एकुण १०,८०,०००/- रुपये किंमतीचा माल केला जप्त

लोणीकंद पोलीस स्टेशन हद्दीत आरोपी हा पहाटेचे वेळी उघडे दरवाजावाटे,कॉलेज परीसरातील हॉस्टेलमध्ये प्रवेश करुन विदयार्थीच्या रुममध्ये चार्जिगला लावलेले किंवा ठेवलेले लॅपटॉप चोरी करुन गुन्हा करीत असल्याने गुन्हा दाखल करण्यात आला. अशा प्रकारे वारंवार घडणा-या गुन्हयांचा पध्दतीचा अभ्यास करुन मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विश्वजीत काइंगडे यांनी तपास पथकातील अधिकारी सपोनि गजानन जाधव व सपोनि रविंद्र गोडसे यांना लॅपटॉप चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेकामी योग्य त्या सुचना देवुन रायसोनी कॉलेज परिसरात पेट्रोलिंग करणेबाबत व सापळा लावुन कारवाई करणेबाबत सुचना दिल्या होत्या.

दिनांक १५/१०/२०२३ रोजी रायसोनी कॉलेज परिसरात पेट्रोलिंग करुन सापळा लावुन थांबले असताना रायसोनी कॉलेज परिसरात लॅपटॉप चोरी करणारा चोरटा हा रायसोनी कॉलेजचे मुख्य गेट समोर उभा असुन त्याने अंगात फुल बाहयांचा निळया रंगाचा शर्ट व काळया रंगाची पॅन्ट घातलेली आहे.सदरची बातमी पोलीस अंमलदार फरांदे यांनी तपास पथकाचे सपोनि गजानन जाधव यांना सांगितली असता त्यांनी वरील पोलीस स्टाफचे मदतीने रायसोनी कॉलेज समोरील मुख्य गेट समोर यशस्वी सापळा लावुन मिळालेल्या बातमीप्रमाणे अंगात फुल बाहयांचा निळया रंगाचा शर्ट व काळया रंगाची पॅन्ट घातलेले इसमास ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव व पत्ता **निलेश प्रफुलचंद कर्नावट, वय ३९ वर्ष, रा. मु.पो. नांद्रा, ता. पाचोरा, जि. जळगाव** असे असल्याचे सांगितले.

तसेच लॅपटॉप चोरी झालेल्या घटनास्थळ ठिकाणांचे सीसीटिव्ही फुटेज चेक केले असता सीसीटिव्ही फुटेजमध्ये दिसणारा आरोपी ताब्यात घेण्यात आलेला आरोपी एकच असल्याचे समजुन आल्याने त्यास विश्वासात घेवुन अधिक तपास केला असता त्याने पुणे शहरातील रायसोनी कॉलेज, सिंहगड कॉलेज, सिम्बॉयसेस कॉलेज, एमआयटी कॉलेज, वारजे माळवाडी, देहु, बिबवेवाडी, लोणावळा परिसरातुन लॅपटॉप चोरीचे गुन्हे केले असल्याची कबुली दिली आहे.

नमुद आरोपीचे मा.न्यायालयाकडुन पोलीस कस्टडीची रिमांड घेवुन आरोपीकडुन वेगवेगळया कंपनीचे **एकुण २७ लॅपटॉप, १ टॅब व १ मोबाईल हॅण्डसेट** असा एकुण **१०,८०,०००/- रुपये किंमतीचा** मुद्देमाल जप्त करण्यात आलेला असुन नमुद गुन्हयाचा पुढील अधिक तपास **पोलीस नाईक अजित फरांदे** हे करीत आहोत. **आरोपीकडे केलेल्या तपासात** लोणीकंद,भारती विद्यापीठ,वारजे बिबवेवाडी,वानवडी,लोणीकाळभोर व दिघी या पो.स्टे कडील **गुन्हे उघडकीस आलेले आहेत.**

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे,श्री रंजनकुमार शर्मा मा.पोलीस उपआयुक्त परिमंडळ ४,पुणे श्री. शशिकांत बोराटे मा.सहा.पोलीस आयुक्त येरवडा विभाग,श्री. संजय पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. विश्वजीत काइंगडे लोणीकंद पोलीस ठाणे, पुणे शहर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.मारुती पाटील यांचे मार्गदर्शना खाली तपास पथकाचे सपोनि गजानन जाधव, रविंद्र गोडसे, सपोफौ बाळासाहेब सकाटे, पोलीस हवालदार संदीप तिकोणे, पोलीस नाईक अजित फरांदे, सागर जगताप, विनायक साळवे, स्वप्नील जाधव, कैलास साळुंके, अमोल ढोणे, आशिष लोहार, पांडुरंग माने, मल्हारी सपुरे, साई रोकडे, दिपक कोकरे, शुभम चिनके, सचिन चव्हाण यांनी केली आहे.


महाराष्ट्र पोलीस